अ) **पात्रतेकरीता अटी व शर्ती –**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२. मागासवर्गीय उमेदवारांची नजीकच्या कालाधीतील सक्षम प्राधीकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक राहील.

३. वयोमर्यादा (दि. ०१/१२/२०२५ रोजीची गणली जाईल) सेवानिवृत्त अधिकारी, वयोमर्यादा ओलांडलेले पशुवैद्यक सुध्दा अर्ज दाखल करू शकतात.

४. पद अ. क्रं. १ करीता महाराष्ट्र राज्य पशुवैद्यकिय परीषद (MSVC) किंवा भारतीय पशुवैद्यकिय परीषद (VCI) यांचे वैद्य नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

**ब) भरतीबाबत इतर आवश्यक सुचना –**

१. उमेदवाराने अर्जातील माहीतीचा तपशील सुस्पष्टपणे नमुद करावा.

२. अर्ज करतांना उमेदवारांची जन्मतारीखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालान्त परीक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. विद्यापीठाची पदवीचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, जात वैद्यता प्रमाणपत्र व इतर संपुर्ण आवश्यक प्रमाणपत्राचा साक्षांकित प्रती जोडुन विहीत नमुन्यामध्ये माहीती भरून आपले अर्जे मुलाखतीच्या वेळेस सादर करावे.

३. उमेदवारांनी पदाकरीता भरून द्यावयाचा नमुना अर्ज म.न.पा. च्या संकेत स्थळावर (www.nmcnagpur.gov.in) उपलब्ध आहे. अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

४. निवड प्रकियेच्या कोणत्याही टप्प्यांवर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

५ आवेदन स्विकृत / अस्विकृत करण्याचे अधिकार, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल करण्याचे तसेच त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याबाबतचे संपुर्ण अधिकार आयुक्त, नागपुर महानगरपालिका, नागपुर यांच्याकडे राखुन ठेवलेले आहे.

६. परिपुर्ण भरलेले व सर्व आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रति जोडलेले अर्ज मुलाखतीच्या तारखेस सादर करावेत. सदर दिनांकांनंतर प्राप्त झालेले अर्ज, विहीत वय व पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, विहीत नमुन्यात नसलेले अर्ज, मजकुर अपूर्ण व चुकीचे, साक्षांकित प्रती न जोडलेले अर्ज, अधिवास व लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र न जोडलेले अर्ज, अपुर्ण अर्ज तसेच अन्य उणिवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील / विचारात घेतले जाणार नाहीत.

७. गुणवत्ता यादी म.न.पा. च्या संकेत स्थळावर (https://www.nmcnagpur. gov.in) प्रसिध्द करण्यात येईल.

उपायुक्त तथा संचालक
घनकचरा व्यवस्थापन विभाग
नागपुर महानगरपालिका, नागपूर